N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** उमरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0009 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/01/2026 21:25

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 21/01/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/01/2026
**Time From (वेळेपासून):** 11:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/01/2026 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 020

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/01/2026 20:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 10 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** धानोरा ,उमरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रिती रमेश जाधव
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला प्र वि नांदेड ,नांदेड ,उमरी,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ला प्र वि नांदेड ,नांदेड ,उमरी,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-8381041809

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | साईनाथ किशन कांचने | | | 1. सिध्दार्थ नगर बाळापुर ,धर्माबाद ,उमरी,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | कपील माधव देवके | | | 1. धानोरा ,उमरी ,उमरी,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम 3000 रुपये, | 3,000.00 |



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | 500 रुपये दराच्या 6चलनी नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

3,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी प्रिती पिता रमेश जाधव, वय 36 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड. मोबाईल क्रमांक 83810 41809
सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे मागील दोन वर्षापसून पोलीस निरीक्षक (एक टप्पा पदोन्नती) म्हणून कार्यरत आहे.
आम्ही दिनांक 20/01/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना प्रभारी अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार श्री.माधवराव संभाजी कदम, वय 48 वर्षे, व्यवसाय शेती, रा.बाचेगाव, ता.धर्माबाद, जि. नांदेड यांची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणेबाबत आदेशीत केले.
त्यावरून आम्ही तक्रारदार श्री.माधवराव संभाजी कदम यांना विचारपुस केली. तेंव्हा तक्रारदार यांनी कळविले की, ''माझी मौजे बाचेगाव, ता.धर्माबाद येथे अडीच एकर शेती आहे. सदर शेती मध्ये विहीर असुन त्यावर लाईटचे कनेक्षन/कोटेशन 5 एच.पी.चे माझे वडील कै.संभाजी गोविंदा कदम यांचे नाव आहे. विहीरीवरील लाईटचे कनेक्षन दिनांक 16/01/2026 रोजी लाईनमन कांचने व त्यांचे सोबत असलेले खाजगी व्यक्ती कपील यांनी कट करून विहीरीवरील पाण्याच्या मोटारीचे स्टार्टर काढुन नेले आहे.
त्यानंतर दिनांक 18/01/2026 रोजी आमच्या गावातील गंगाधर शेळके यांचे घरी लाईनमन कांचने व खाजगी इसम कपील हे आले होते. त्यावेळी मी तेथे गेलो होतो. लाईनमन कांचने यांना विहीरीवरील स्टार्टर काढुन कनेक्षन बंद का केले याबाबत विचारणा केली. त्यावर लाईनमन कांचने यांनी तुमच्या विहीरीवर दोन मोटारी असल्याने कनेक्षन कट केले असे म्हणाले. त्यावर मी त्यांना म्हणालो की, माझे विहीरीवर एकच मोटार चालु असुन दुसरी मोटार ही मोटार खराब झाल्यावर वापरण्यासाठी ठेवली आहे. कांचने यांना गंगाधर शेळके यांचे समक्ष माझे विहीरीवरील पाण्याच्या मोटारीचे स्टार्टर परत करून लाईटचे कनेक्षन जोडण्यासाठी विनंती केली. त्यावेळी कांचने यांनी मला कपील याचेशी बोला, मी त्याला सांगीतले आहे, तसे करून टाका, असे सांगून तेथून निघून गेले.
त्यानंतर मी, कपील यांचेशी बोललो असता त्याने मला सांगीतले की, कट केलेले कनेक्षन जोडायचे असेल तर तुम्हाला 4,500/- रू. द्यावे लागतील असे कांचने साहेबांनी सांगीतले आहे. तेंव्हाच मी तुम्हाला कनेक्षन जोडुन देतो असे म्हणाला. त्यावर मी ठीक आहे, व्यवस्था करतो असे म्हणुन निघुन आलो.
करखेली 33 के.व्ही.उपकेंद्र, एम.एस.ई.बी.कार्यालयाचे लाईनमन कांचने व त्यांचे सोबत राहणारा खाजगी व्यक्ती कपील यांनी माझे शेतातील विहीरीवरील पाण्याचे मोटारचे कनेक्षन जोडुन देण्यासाठी मागणी करीत असलेले 4,500/- रूपये हे लाच असल्याचे मला माहित आहे. शेतीतील पिकाचे नुकसान होवु नये या भितीपोटी मी त्यांना होकार देवुन आलो आहे. परंतु मला, लाईनमन कांचने यांना लाच देण्याची ईच्छा नसुन आमच्यात कोणताही देण्या-घेण्याचा आर्थिक व्यवहार किंवा वैर अथवा दुश्मनी नाही.
तरी मी दिनांक 21/01/2026 रोजी लाईनमन कांचने यांची बाचेगाव येथे भेट घेणार आहे. भेटी दरम्यान लाईनमन कांचने यांनी स्वतः अथवा इतरा मार्फत लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी'' असे सांगुन लेखी तक्रार दिली. त्यावर तक्रारदार व आम्ही सही केली आहे.
आम्ही मा.पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांचे तोंडी आदेशान्वये पोलीस निरीक्षक श्री. करीम खान पठाण यांच्याकडून त्यांच्याकडे उपलब्ध असलेले दोन शासकीय पंच 1) श्री.सतिष गंगाधर बोधनकर,



Scanned with OKEN Scanner

पद कनिष्ठ लिपीक, नेमणुक अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, नांदेड 2) श्री. शिवशंकर माणीकराव नैताम, पद कनिष्ठ लिपीक, नेमणुक अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, नांदेड असे पंच उपलब्ध करून घेतले. दिनांक 21/01/2025 रोजी शासकीय वाहन क्रमांक एम.एच.26 आर.0342 मध्ये चालक पोहेकॉ/नामपल्ले यांचेसह आम्ही, दोन पंच व सपळा पथकातील सदस्य पोहेकॉ/2197, वच्चेवार, पोहेकॉ/1065 कणसे, पोहेकॉ/1082 दाबनवाड असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयातून 07.30 वाजता नांदेड येथून निघून बारड-मुदखेड-उमरी मार्गे नागदेवता मंदिरा जवळ रावधानोरा शिवार कॅनल रोड जवळ 10:30 वाजता पोहोचून शेजारी निर्जनस्थळी जावून थांबलो. त्यानंतर थोडया वेळात तक्रारदार सदर ठिकाणी आले. त्यानंतर आम्ही सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच व तक्रारदार यांची एकमेकांना ओळख करून दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी तोंडी सांगितलेली व लेखी दिलेली तक्रार ही एकच असल्याची खात्री केली आणि त्यावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. ज्यावर आम्ही व तक्रारदार यांनी यापुर्वीच स्वाक्षरी केली आहे.तसेच आमचे सुचनेवरुन पोहेकॉ/कणसे यांनी तक्रारदार व दोन्ही पंच यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर, मेमरीकार्ड याबाबत माहिती दिली. त्यानंतर पोहेकॉ/कणसे यांनी आमचे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरीकार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर तक्रारदार यांनी सांगीतले की, लोकसेवक कांचने हे बाचेगाव येथे आलेले आहेत. त्यावरून सर्वानुमते तक्रारदार यांना लाच पडताळणी कारवाईसाठी पाठविण्याचा निर्णय घेतला. आमचे सचुनेवरून पोहेकॉ/कणसे यांनी 11.24 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळयात लटकावुन देवून तक्रारदार व पंच क्र. 01 सतिश बोधनकर यांना लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांनी सोबत आणलेली मोटार सायकल क्र. एम.एच.26 बी.एस.9124 ने बाचेगाव येथे रवाना केले. त्यानंतर 12.00 वाजता तक्रारदार व पंच क्र. 01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.

त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्र. 01 यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत वेगवेगळे विचारणा केली. त्यावेळी पंच क्र.1 सतिश बोधनकर यांनी सांगितले की, मी, तक्रारदार यांचेसह बाचेगाव येथे गेलो, तेथे लोकसेवक कांचने हे आम्हास भेटले. लोकसेवक कांचने यांनी तक्रारदार यांचे काम करून देण्यासाठी त्यांना सांगीतले की, ''देता की, तुम्ही काम करून टाका आमच.....आम्हाला काय भी नाही राहत वो ते,....तुम्ही सरळ वागल्यावर आम्ही सरळ वागणारे हा, आम्ही कशाला वाकड जावाव.....तुम्ही बोला, तुम्हाला काय करायच ते करा, आम्ही विश्वास करता हो तुमच्यावर....कपीलला द्या, कपील सांगते तुम्हाला'' त्यावर तक्रारदार यांनी ''कपीलने साडेचार हजार म्हणला होता'' असे म्हणाले असता त्यावर लोकसेवक कांचने यांनी ''द्या, द्या,.... कपीलला देवुन टाका'' असे म्हणाले. त्यानंतर लोकसेवक कांचने हे तक्रारदार यांना म्हणाले, ''तुम्ही किती म्हणाल्या सांगा, मग मी सांगतो लास्ट.... ते आता तुम्हीच सांगा.... सांगा की तुम्ही येवढे म्हणा मला काय'' यावर तक्रारदार यांनी तीन हजार रूपय देतो बघा असे म्हणाले. तेंव्हा लोकसेवक कांचने यांनी ''बर.... द्या, बर की'' असे म्हणुन लाचेची मागणी केल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व लोकसेवक कांचने यांचे भेटीदरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यावरून तक्रारदार व पंच क्र.1 हे सांगत असलेली हकीकत तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण एकच असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लाच स्विकृती सापळा कार्यवाही करण्याचे ठरले. परंतु तक्रारदार यांना माहिती कळाली की, खाजगी ईसम कपील हे सध्या गावात नाहीत. त्यामुळे आम्ही त्यांची काहीवेळ वाट बघीतली. तसेच तक्रारदार यांनी विनंती केली की, कपील आज गावात येणार नसल्याने मला उद्या पैसे देवुन पाठवावे व सापळा कार्यवाही करावी. त्यावरून सदर सापळा कार्यवाही दिनांक 22/01/2026 रोजी करण्याचे ठरले. त्यानंतर तक्रारदार यांना योग्य त्या गोपनियते बाबत सुचना देवुन घरी जाण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकीय वाहनाने परत आलो.

दिनांक 22/01/2026 रोजी शासकीय वाहन क्रमांक एम.एच.26 आर.0342 मध्ये चालक पोहेकॉ/नामपल्ले यांचेसह आम्ही, दोन पंच व सपळा पथकातील वरीलप्रमाणे सदस्य असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयातून 09:30 वाजता नांदेड येथून निघून नागदेवता मंदिरा जवळ रावधानोरा शिवार कॅनल रोड येथे 11:30 वाजता पोहोचून शेजारी निर्जनस्थळी जावून थांबलो. त्यानंतर थोडया वेळात तक्रारदार सदर ठिकाणी आले. तक्रारदार यांनी कळविले की, लाईनमन कांचने हे धानोरा गावात आहेत. परंतु कपील कोठे आहे हे माहित नाही. त्यामुळे आम्ही कपील यांचे लोकेशन घेण्यासाठी तक्रारदार यांचे मोबाईल फोनवरून कॉल करून माहिती घेण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार कदम यांचा मोबाईल फोन क्रमांक 9765482303 यावरून कपील यांचा मोबाईल फोन क्रमांक 7887986358 यावर 12.21 वाजता कॉल केला असता सदर फोन हा व्यस्त असल्याचे समजले. आमचे



Scanned with OKEN Scanner

सुचनेवरून पोहेकॉ/कणसे यांनी सदर कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत केला आहे.
त्यानंतर आम्ही, कपील याचा कॉल येईल म्हणुन काहीवेळ वाट बघीतली. परंतू कपील यांचा कॉल न आल्याने सर्वानुमते धानोरा गावात जावुन सापळा कार्यवाही आजमावण्याचा निर्णय घेतला.
त्यावरून तक्रारदार यांनी त्यांचे जवळील 3,000/- रुपये रक्कम (ज्यात पाचषे रुपये दराच्या 06 भारतीय चलनी नोटा) पंचासमक्ष हजर केल्या. पोहेकॉ/दाबनवाड यांनी लाच रक्कम 3,000/- रूपयेच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे पॅन्टचे मागील उजव्या खिशात अलगद ठेवून दिले.
त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी त्यांचे गळयात 12:35 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून गळयात अडकावून पंच क्र. 1 सतिष बोधनकर यांच्या सोबत मौजे धानोरा येथे रवाना केले. त्यानंतर त्यांच्या पाठोपाठ आम्ही व सापळा पथक त्यांच्यावर नजर ठेवून त्यांच्या मागे-मागे मौजे धानोरा येथे गेलो. त्यानंतर तक्रारदार हे 12:45 वाजता मौजे धानोरा येथील मुख्य रस्त्यावर पोहचले. त्यानंतर खाजगी ईसम कपील यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा तक्रारदार यांनी पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर आम्ही व सापळा पथक तात्काळ सदर ठिकाणी गेलो असता, त्याठिकाणी रोडचे बाजूने खाजगी ईसम कपील आमचे दिशेने येत होता. तेंव्हा आम्ही त्यांना आमचा परिचय देवून त्यांच्यावर अँन्टीकरप्शनची कारवाई झाल्याचे कळविले. त्यानंतर बाजूस असलेले श्री.आनंदा चंदर चंबोले यांचे चहा-नास्टाचे हॉटेल मध्ये घेवुन गेलो. तेंव्हा आम्ही पंच क्र. 2 यांचे कडून त्यांचे शर्टाचे समोरील खिश्यात ठेवलेले अँन्थॉसिन पावडरयुक्त 3,000/- रूपये लाचेची रक्कम हस्तगत केली. त्यानंतर खाजगी ईसम कपील यास कांचने कुठे आहेत असे विचारले असता त्यांनी मला माहित नाही असे उत्तर दिले. तेंव्हा तेथे जमलेल्या इसमाकडून समजले की, सदर हॉटेलच्या आतील बाजुस लोकसेवक कांचने यांची रूम आहे. त्यावरून आम्ही सदर हॉटेलच्या आतील रूम मध्ये गेलो असता तेथे लोकसेवक कांचने मिळून आले. त्यांना आम्ही आमचा परिचय देवुन त्यांच्यावर अँन्टीकरप्शनची कारवाई झाल्याचे कळविले.
तरी तक्रारदार श्री.माधवराव संभाजी कदम, वय 48 वर्षे, व्यवसाय शेती, रा.बाचेगाव, ता.धर्माबाद, जि. नांदेड यांनी दिनांक 20/01/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे तक्रार दिली होती.त्यावरून दिनांक 21/01/2026 रोजी 11:24 ते 12:00 वाजण्याचे दरम्यान मौजे बाचेगाव, ता.धर्माबाद येथे पंचा समक्ष लाच मागणी पडताळणी दरम्यान लोकसेवक साईनाथ किशन कांचने, वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद वरिष्ठ तंत्रज्ञ, नेमणुक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शाखा करखेली, ता.धर्माबाद, जि.नांदेड, रा.सिध्दार्थ नगर, बाळापूर, ता.धर्माबाद, जि.नांदेड यांनी तक्रारदार यांना त्यांचे विहीरीवरील पाण्याच्या मोटारचे कट केलेले कनेक्षन परत जोडून देण्यासाठी 4,500/- रूपयाची मागणी करून तडजोडीअंती 3,000/- रूपये खाजगी ईसम कपील यांचेकडे देण्यास सांगीतले.
त्यानंतर दिनांक 22/01/2026 रोजी 12.35 ते 12.50 वाजण्याचे दरम्यान करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांनी खाजगी ईसम कपील याची मौजे धानोरा येथे शासकीय पंचासमक्ष भेट घेतली. त्यावेळी खाजगी ईसम कपील यांनी स्वतःसाठी व लोकसेवक साईनाथ कांचने यांचेकरीता लाच देण्यास प्रोत्साहन देवुन तक्रारदार यांचेकडून 3,000/- रूपये लाच रक्कम स्विकारल्याने रंगेहाथ मिळून आले.
म्हणून माझी लोकसेवक साईनाथ किशन कांचने, वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद वरिष्ठ तंत्रज्ञ, नेमणुक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शाखा करखेली, ता.धर्माबाद, जि.नांदेड, रा.सिध्दार्थ नगर, बाळापूर, ता.धर्माबाद, जि. नांदेड व खाजगी ईसम कपील माधव देवके, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती व खाजगी इलेक्ट्रीशिअन, रा.धानोरा, ता. उमरी, जि.नांदेड यांचे विरूध्द कलम 7, 7अ, 12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
JAYPRAKASH KASHINATH GUTHE(I (Inspector)) / 14901000362JKGM7701F **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): JAYPRAKASH KASHIN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 14901000362JKGM770

पोलीस स्टेशन, उमरी ता. उमरी जि. नांदेड



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner

## General Diary Details
## ठाणे दैनंदिनी तपशील

**State (राज्य):** महाराष्ट्र **District (जिल्हा):** नांदेड

**P.S. (पोलीस ठाणे):** उमरी

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.):** 021
2. **G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ):** 22/01/2026 21:45 वाजता
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार):** अटक/शरण
4. **Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी )):** JAYPRAKASHKASHINATHGUTHE /पोलीस निरीक्षक
5. **Case Type (प्रकरणाचा प्रकार) :**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**

यावेळी आम्ही पोलीस निरीक्षक, साईप्रकाश चन्ना, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड नोंद करतो की, पो.स्टे. उमरी, ता. उमरी, जि.नांदेड येथील गुरनं. 09/2026 कलम 7,7अ,12 भ्र.प्र.अधिनियम 1988 प्रमाणे दि. 22/01/2026 रोजी गुन्हा दाखल असुन नमुद गुन्ह्यातील आरोपी क्र.1) साईनाथ किशन कांचणे, वय 44 वर्शे, व्यवसाय नौकरी पद वरिष्ठ तंत्रज्ञ, नेमणुक महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनी, शाखा करखेली, ता.धर्माबाद, जि.नांदेड, रा. सिध्दार्थ नगर, बाळापुर, ता.धर्माबाद, जि.नांदेड, यांना नमुद गुन्हायात अटक करुन अटकेची माहीती त्याचे काका -नागेश नारायण सहदेव वय-48 वर्षे व्यवसाय आटो चालक रा.सुभाष नगर धर्माबाद व त्यांची पत्नी सौ अंकुताई साईनाथ कांचने वय-30वर्षे व्यव-घरकाम रा.सिध्दार्थ नगर,बाळापुर ता.धर्माबाद जि.नांदेड यांचे मो.क्र.9011193781 वर दिली आरोपी क्र. 2) कपिल माधव देवके, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती व खाजगी ईलेक्ट्रीशियन, रा.धानोरा, ता.उमरी, जि.नांदेड (खाजगी इसम) यांना नमुद गुन्ह्यात अटक करुन अटकेची माहिति त्याचा मेव्हणा प्रथविराज साहेबराव गजभारे वय-22वर्षे व्यव-मजुरी रा.सिंध्दी ता.उमरी यांना दिली आहे.

सदर गुन्हयातील दोन्ही आरोपीतांना दि. 22/01/2026 रोजी यशस्वी सापळा कारवाई झाल्यानंतर त्यांना 12:45 वाजता ताब्यात घेण्यात आले आहे. त्यानंतर पो.स्टे उमरी, ता. उमरी, जि. नांदेड येथे गुरनं.09/2026 कलम 7, 7अ, 12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल झाल्यानंतर खालील कारणास्तव गुन्हयात अटक करण्यात येत आहे.

1) गुन्हयाचे अन्वेषन योग्य प्रकारे होण्यासाठी.
2) आरोपीने अन्य कोणताही अपराध करण्यापासुन त्यास परावृत्त करण्यासाठी.
3) फिर्यादी, साक्षीदार यांचेवर वचन, धमकी, प्रलोभन यांचा प्रभाव टाकण्यापासुन परावृत्त करण्यासाठी.
4) आरोपी लोकसेवकास अटक केली नाही तर ते तपासी अधिकारी समोर अथवा मा.न्यायालया समक्ष हजर राहणेची शास्वती वाटत नसल्याने.
5) आरोपी लोकसेवक यांचा आवाजाचा नमुना घेणेसाठी.
6) सदर गुन्हयाचा दोन्ही आरोपीतांकडे अधिक तपास करून सबळ पुरावा गोळा करण्यासाठी.

7. **G.D. Subject (ठा. दै. चा विषय):**

गुरन 09/2026 कलम 7,7अ,12 भ्र.प्र.अधिनियम 1988 प्रमाणे

8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|



Scanned with OKEN Scanner